आरती मायबाईची

जय देवी जयदेवी जय अंबाबाई ओवाळू आरती प्रेमे, तुज मायबाई ।।

पती पुत्रासह देवा दान दिले, संसारा अर्पिले नाथांपायी पती-पत्नी त्याग महान तो झाला, उपकार केला विश्वावरी तव हा त्याग वेदही गातील, पुराणे वर्णतील युगायुगी ॥१॥

जय देवी जयदेवी जय अंबाबाई ओवाळू आरती प्रेमे, तुज मायबाई ।।

विश्वजीवनासी सुगंधीत केले, जीवन जाळीले विश्वप्रेमे सितेचे मांगल्य, वसे तूज ठायी, प्रेम वात्सल्याची मुर्ती तू आई तुझिया त्यागाने विश्वा मिळे नाथ, म्हणूनि चरणी तुझीया डोई ॥२॥

जय देवी जयदेवी जय अंबाबाई ओवाळू आरती प्रेमे, तुज मायबाई ।।

आदिशक्ती खरी तुझिया रुपाने, म्हणोनिया जना नाथ दिला, किती वर्णं तुझे उपकार अंबे, विश्वा जगदंबे तारिलेसी । त्यागाचा महिमा वर्णवेना सार, नित्य तव ध्यान असो अंबाबाई ।।३।।

जय देवी जयदेवी जय अंबाबाई ओवाळू आरती प्रेमे, तुज मायबाई ।।

अंबाआई तू गे, जीवन अर्पिले, विश्वजीवन फुलविले डव्हाग्रामी । प्रणाम ने तुज माते कोटी कोटी, भक्तां उघडली ताटी उद्धाराची । नित्य प्रति बंदू मायबाई आता, दास ठेवी माथा चरणी आई ।।४।।

जय देवी जयदेवी जय अंबाबाई ओवाळू आरती प्रेमे, तुज मायबाई ।।